# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ४ थे अंक ३०७ शुक्रवार दि.०६ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## बकरी ईदवर मंदीचे सावट बोकडविक्रीत घट व्यापारी चिंतेत



जिल्हातील सर्वांत मोठ्या बकरी बाजारात बोकडांची अपेक्षित प्रमाणात खरेदी-विक्री झालेली नाही. तर काही परराज्यातील बकरी व्यापारी आणि बकरी ईद निमित्ताने कुर्बानीसाठी बकरा घेणारे ग्राहक महागाईमुळे कमी झाल्याने बाजारावर मंदीचे सावट आल्याचे, बाजार नरम असल्याचे दिसून आले.

दरम्यान, मुस्लिम समाजाचा सर्वांत महत्त्वाचा सण बकरी ईद जवळ आला आहे. बकरी ईदनिमित्त कुर्बानीसाठी खास बकरा हवा असतो. 'बकरी ईद' म्हणजे ईद-उल-अझा हा त्यागाचा सण म्हणून मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात साजरा करतात.

ठाणे जिल्ह्यातील सर्वांत मोठा बकरी बाजार भिवंडी तालुक्यातील कोनगाव तरीपाडा भागात भरतो. गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी आठवड्यातून तीन दिवस बारामाही बकरी बाजार भरतो.

त्यातच दरवर्षी बकरी ईद निमित्ताने हा बाजार महिनाभर सुरू असतो. हा बाजार संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. मंगळवार, गुरुवार आणि शनिवार या तीन दिवसांत भरणा-या बकरी बाजारात यंदा बकरी ईद निमित्ताने बकरे विक्रीसाठी गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांतून मोठ्या संख्येने व्यापारी आले आहेत. मात्र, गेल्या २० दिवसांपासून खूपच कमी प्रमाणात बक-यांची विक्री झाल्याची खंत व्यापा-यांनी व्यक्त केली.

२५ हजारांपासून ते ९० हजारांपर्यंत विक्री

बकरी ईदला कुर्बानीसाठी पांढ-या शुभ्र बक-याला अधिक मागणी असते. या बक-याची २५ हजारांपासून ते ९० हजारांपर्यंत विक्री केली जाते. मुस्लिम बांधव हे बकरे महाग असूनही खरेदी करताना दिसतात. विशेष म्हणजे परराज्यातील बकरे कोनगाव बकरी बाजारात उघड्यावरच बांधून ठेवत असल्याने पावसामुळे आजारी पडत आहेत.

सणावर पावसाचे संकट

मार्च ते मे महिन्यात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लग्नसराई असते. या लग्नसराईत हळदी सभारंभात मटणाची जेवणावळ असते. त्यामुळे या दिवसातही बक-यांच्या किमती या १० ते ३० हजारांपर्यंत असतात. मात्र, यंदाच्या बकरी ईद सणावर पावसाचे सावट असल्याने बकरे व्यापारी चिंता व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे परराज्यातील व्यापारी ट्रक-टेम्पोने हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे बकरे बाजारात आणले आहेत. परंतु, प्रवासाचे भाडेही अजून वसूल झाले नसल्याचे एका व्यापा-याने सांगितले.

## आता लातूर जिल्हा मजुर फेडरेशनसाठी कॉंग्रेस, भाजपा एकत्र







लातूर / दै. महावृत्त :- गेली कित्येक वर्षे कॉंग्रेसच्या ताब्यात असलेल्या लातूर जिल्हा मजूर संस्था फेडरेशनमध्ये याहीवेळी एकतर्फी विजय होणार हे निश्चित होते. परंतु असे असताना सुद्धा कॉंग्रेस नेतृत्वाने विधानसभेतील पराभवाचा धसका घेत राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना यांच्याशी भीतीपोटी युती केली,यात सर्वाधिक आश्चर्याची बाब म्हणजे कट्टर विरोधक असलेल्या भाजपलाही सोबत घेऊन कॉंग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यावर अन्याय केल्याची भावना कार्यकर्त्यातून व्यक्त केली जात आहे. कॉंग्रेस पक्षाचे एकूण १० सदस्य असतानाही चेअरमनपद कॉंग्रेसला तर व्हा. चेअरमन हे भाजपला देऊन जणू विरोधकांपुढे नांगी टाकली असल्याची जोरदार चर्चा कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेत सुरू आहे. ग्रामीण-रेणापूर कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी लातूर नेत्यांकडे हट्ट धरून किंवा पक्ष सोडण्याची धमकीवजा भीती दाखवत तब्बल चार सदस्य एकाच मतदार संघातील घेण्यास भाग पाडले. यातून लातूर जिल्हा कॉंग्रेस रेनापूरपुढे हतबल झाल्याचे सिद्ध होते आहे. अशा संधीसाधू आणि सेटलमेंट राजकारणामुळे लातूर जिल्ह्यात लातूर ग्रामीणची विधानसभा हातची गेली, ती अशाच कारणांमुळे. आता जिल्ह्यात एकच आमदार राहिला आहे तोही थोडक्यात पडता पडता. जिल्हा नेतृत्व अशीच बोटचेपी धोरण राबवणार असेल तर तोही पुढच्या वेळीस राहिल अशी परिस्थिती मुळीच दिसत नाही. लातूर जिल्ह्यात कॉंग्रेस जवळपास संपल्यात जमा आहे,असे म्हणू शकतो. लातूरच्या नेतृत्वाने जिल्ह्यात पक्षातील निष्ठावान कार्यकर्ते यांना संपवून लाचार कार्यकर्त्यांची फौज निर्माण केली आहे आणि म्हणूनच कॉंग्रेसची ही दुर्दशा लातूर जिल्ह्यात झाली आहे.आता तरी नेत्यांनी विचार करायला हवा नाही तर उरली सुरली जिल्ह्यातील कॉंग्रेस संपून जाईल हे मात्र नक्की.

## रमेशआप्पांच्या हातून सातत्याने सत्कर्म घडावे अश्रू पुसण्याची ताकद परमेश्वराने त्यांना द्यावी आ. कराड यांच्या जन्मदिनानिमित्त सत्कार सोहळ्यात हभप गहिनीनाथ महाराज औसेकर






लातूर :- भाजपा कार्यकर्त्यांबरोबरच लातूर ग्रामीण मतदार संघातील अडीअडचणी सोडवण्याची आणि ज्यांच्या, ज्यांच्या डोळ्यात पाणी येईल त्यांचे अश्रू पुसण्याची ताकद रमेशआप्पा कराड यांना सातत्याने मिळावी एक लाख रुपयातून एक काम होते मात्र एका आशीर्वादाने एक लाख कामे होतात असा आशीर्वाद त्यांना परमेश्वराने द्यावा अशा शुभेच्छा पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिल्या.

आ. रमेशआप्पा कराड मित्र मंडळाच्या वतीने लातूर येथील दयानंद सभागृहात जन्मदिनाच्या निमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि सुविध्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांचा पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते फेटा बांधून यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी आशीर्वादपर मनोगत व्यक्त करताना औसेकर महाराजांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर कार्याध्यक्ष विक्रमकाका शिंदे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

माणसं प्रेम करणारे असतात पण मित्र जीवाला जीव देणारे असतात, माणसाचं नातं तुटतं मात्र जीवाचे नाते कधीच तुटत नाही असे सांगून मित्र मंडळाच्या वतीने दृष्ट लागेल असा अत्यंत सुरेख कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल धन्यवाद देऊन हभप गहिनीनाथ महाराज यावेळी बोलताना म्हणाले की, जन्मदिवस साजरा का करावा मित्र कसा असावा माणसाने कसे वागावे याबाबत शास्त्राची पुरावे देऊन जन्मदिवस प्रत्येकाने साजरा केलाच पाहिजे असे बोलून दाखविले.

जीवनात माणसाची विचार प्रणाली फार महत्त्वाची असते. सतत संघर्ष करणाऱ्या, दूरदृष्टी असणाऱ्या लढवय्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासोबत काम करण्याची दिशा ठरवून रमेशआप्पानी राजकीय जीवनात काम सुरू केले. सत्यासाठी लढत राहिले पाहिजे ही त्यांची कायम धारणा राहिली. सातत्याने सर्वसामान्यांच्या प्रश्नावर संघर्ष केला. अनेकांना मदत केली. जन्मदिनी स्वतःला त्रास झाला तरी चालेल पण विधानसभेत निवडून आणण्यासाठी मेहनत घेणाऱ्या कार्यकर्त्यांची इच्छा पूर्ण झाली पाहिजे यासाठी तब्बल १४ - १५ तास उभे राहून कार्यकर्त्यांची इच्छा पूर्ण करणारे एकमेव नेते आहेत असेही औसेकर महाराज यांनी बोलून दाखवले.

कराड कुटुंब वारकरी सांप्रदायिक आहे नियमित पंढरपूरची वारी करणारे आहे हे माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून हभप गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले की, संत ज्ञानेश्वराचे पसायदान महाराष्ट्र पुरते मर्यादित न ठेवता जगाच्या पाठीवर पोहोचविण्याचे काम कराड कुटुंबांनी केले आहे. त्यागमूर्ती प्रयागआक्का कराड, विश्वधर्मी वि. दा. कराडसर यांचे संस्कार रमेशआप्पांवर आहेत येणाऱ्या काळात त्यांच्या हातून सर्वसामान्यांची सेवा घडेल असे आशीर्वाद दिले.

प्रारंभी मित्र मंडळाचे नवनाथ भोसले यांनी प्रास्ताविकातून जन्मदिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली तर शेवटी रामचंद्र तिरुके यांनी आमदार रमेशआप्पा कराड यांचे कर्तुत्व आणि नेतृत्व लातूर ग्रामीण मतदारसंघातील जनतेने स्वीकारले आहे असे सांगून उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी भागवत सोट, अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, रागिनीताई यादव, सतीश आंबेकर, जगदिश कुलकर्णी, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, प्रताप पाटील, डॉ. एन. पी. जमादार, डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. माले, सुरज शिंदे, शरद दरेकर, बन्सी भिसे, दशरथ सरवदे, शिवसिंह सिसोदिया, वसंत करमुडे, नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर, साहेबराव मुळे, विजय मलवाडे, हनुमंत बापू नागटिळक, अ‍ॅड. मनोज कराड, अ‍ॅड. दशरथ सरवदे, त्र्यंबक गूट्टे, पांडूरंग बालवाड, सचिन लटपटे, माऊली भिसे, राजकिरण साठे, श्रीमंत नागरगोजे, अशोक सावंत, किरण मुंडे, बालाजी गवळी, सचिन मुंडे, श्रीपती मुंडे, ललिता कांबळे, अनुसया फड, राजकिरण साठे, पांडुरंग बालवाड, विजय चव्हाण, सिद्धेश्वर मामडगे, दत्ता सरवदे, आप्पासाहेब पाटील यांच्यासह आ. कराड मित्र मंडळाचे सर्व सहकारी भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते हितचिंतक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी मंत्री तथा चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे मिल रोलरचे पूजन संपन्न





लातूर :- राज्यात नावलौकिक असलेल्या विकास रत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याच्या चालु गाळप हंगामासाठी मिल रोलरचे पूजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते राज्याचे माजी वैद्यकिय शिक्षण मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी ५ जून २०२५ रोजी करण्यात आले त्यानंतर संचालक मंडळाची चालू गळीत हंगाम आढावा बैठक संपन्न झाली आज पर्यावरण दीन निमीत्त कारखाना परिसरात वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

चालु गाळप हंगामात ९ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ठ चालू गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व तयारी केली जात असून मांजरा कारखान्याने आज पर्यंतचे सर्व गळीत हंगाम यशस्वी केले आहेत.त्यानुसार येणारा गळीत हंगाम देखील यशस्वी करून ऊस उत्पादकांचा ऊस वेळेवर गाळप केला जावा यासाठी यंत्रणा सज्ञ होत असुन येणाऱ्या गाळप हंगामामध्ये कारखान्याने ९ लाख मॅट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून गाळपास येणाऱ्या उसाची तोड १००% हार्वेस्टरद्वारे करण्यात येणार आहे कारखाना मालकीचे सध्या ८ हार्वेस्टर उपलब्ध असून येणाऱ्या हंगामासाठी आणखीन कारखाना मालकीचे १७ हार्वेस्टर घेण्याचा निर्णय मांजरा साखर कारखान्याने घेतला असुन १००% हार्वेस्टर द्वारे ऊसतोड करणार आहे कारखाना मालकीचे एकूण २५ हार्वेस्टर व कारखाना हमीवर लातूर जिल्हा बँके मार्फत दिलेले ४३ हार्वेस्टर व इतर हार्वेस्टर असे एकूण ८० हार्वेस्टर द्वारे ऊसतोड करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी बोलताना दिली

पर्यावरण दिनानिमित्ताने कारखान्यावर वृक्षारोपण

आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने कारखान्यावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख व सन्माननीय संचालक मंडळ मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी पर्यावरनाच्या रक्षणासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज असून प्रत्येकानी आपापल्या परीने वृक्षाचे संगोपन करण्यासाठी आवश्यक प्रयत्न करावेत असे मनोगत माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,ट्वेंटी वन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, रेणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अँड प्रवीण पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील, मांजरा साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे, कारखान्याचे संचालक श्रीशैल उटगे,मदन भिसे, नवनाथ काळे, वसंत उफाडे, धनराज दाताळ, तात्यासाहेब देशमुख, ज्ञानेश्वर पवार, भैरू कदम, सदाशिव कदम, निळकंठ बचाटे, सचिन शिंदे, दयानंद बिडवे, बालाजी पांढरे,अनिल दरकसे विलास चामले, अरुण कापरे, कार्यकारी संचालक पंडीत देसाई, माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी, सचिन दाताळ, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, विकास देशमुख,कारखान्याचे खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी कामगार आदींची उपस्थिती होती.

## एचआरएसपी' नंबर प्लेट नसल्यास १६ जूनपासून वाहनांचे कामकाज नाही

लातूर :- राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित सर्व जुन्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एसएसआरपी) बसविण्याचा निर्णय घेतला असून ३० जून २०२५ पर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यास मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे १६ जून २०२५ पर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट न बसविलेल्या वाहनाचे कोणतेही कामकाज प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत केले जाणार नाही, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी कळविले आहे. मात्र, वाहन मालकांनी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यासाठी पूर्व नियोजित दिनांक व वेळ घेतली असल्यास कामकाज करुन दिले जाणार आहे. १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या परिवहन संवर्गातील वाहनांची योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण, परवाना विषयक कामकाज व खाजगी संवर्गातील वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण कामकाज वगळून वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये (आरसी) पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे इत्यादी वाहनविषयक सर्व कामकाज एचएसआरपी नंबरप्लेट बसविल्याशिवाय १६ जून, २०२५ पासून होणार नाही. तरी वाहन मालकांनी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यासाठी पूर्व नियोजित दिनांक व वेळ घेतली असल्यास कामकाज करुन दिले जाईल, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# संपादकीय

## प्लास्टिकचा एवढा अट्टाहास कशासाठी?

पाच जून रोजी पाळला जाणारा 'जागतिक पर्यावरण दिन' हा मानवाच्या बदलत्या जीवनशैलीमुळे होणार्या हानीबाबत आणि विकासासाठी होणार्या निसर्गाच्या शोषणाबाबत जगाला इशारा देत आहे, जागृत करत आहे. यंदाच्या पर्यावरण दिनाची थीम प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणार्या धोक्यांबाबत जागृती करणारी आहे. दरवर्षी जगभरात ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते. त्यातील केवळ १० टक्के पुनर्वापरात येते. उर्वरित प्लास्टिक नदी, समुद्र, जंगल आणि मातीमध्ये मिसळत असून त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे, निसर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची सुरुवात १९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे झालेल्या पर्यावरण परिषदेपासून झाली. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांत व वेगळ्या विषयांवर आधारित हा दिन साजरा केला जात आहे. संयुक्त राष्ट्रांनी यंदाच्या पर्यावरण दिनासाठी निवडलेली थीम आहे, 'बीट प्लास्टिक पोल्युशन!' मानवाच्या दैनंदिन जीवनाला व्यापून टाकलेल्या प्लास्टिकने आज पर्यावरणापुढे मोठे आव्हान उभे केले आहे. पूर्वीच्या काळी प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा वापर केला जात नव्हता. त्या काळात कापडी, कागदी पिशव्या लोक वापरत होते, पण कालांतराने प्लास्टिकच्या पिशव्यांची उपलब्धता वाढली अण्णि हा एक सोपा पर्याय आहे हे दिसल्यानंतर त्याच्या वापरापेक्षाही जास्त गैरवापर वाढला. प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा फार मोठा धोका पर्यावरणाला आहे.

आपण एक कागदी पिशवी वापरली तर हा कागद नैसर्गिर्क पद्धतीने नष्ट होण्यासाठी केवळ पाच आठवडे लागतात. त्याची कुजण्याची प्रक्रिया तत्काळ होते आणि त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून हानी होत नाही. कापडी पिशव्यांचे कापड नष्ट होण्यासाठी पाच महिने लागतात. ते कापड जमिनीखाली गाडून ठेवले तर पाच महिन्यांनी ते पूर्णपणे कुजते. त्यामुळे पर्यावरणाला त्यापासून नुकसान होत नाही. प्लास्टिक पिशव्यांचे मात्र तसे नाही. सध्या ज्यापासून प्लास्टिकच्या कॅरी बॅग बनवल्या जातात. ते प्लास्टिक नैसर्गिकपणे नष्ट होण्यासाठी निसर्गाला ५०० वर्षांपेक्षा जास्त कालावधी लागतो. त्यामुळे ते नैसर्गिकपणे नष्टच होत नाही.

प्लास्टिकच्या अतिवापरापेक्षा गैरवापरामुळे निसर्गाचे मोठे नुकसान होत आहे. आज प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर ही गरज वा सोय कमी आणि स्टाईल अधिक बनली आहे. साध्या औषधाच्या गोळ्या घेतल्या तरीसुद्धा लोक दुकानदाराकडे कॅरी बॅग मागतात आणि ती दिली नाही तर जोरजोरात भांडतात देखील. शेवटी दुकानदारही गिर्हाईक टिकवायचे असते म्हणून ते कॅरी बॅग देतात. बरेचदा या कॅरीबॅग इतक्या पातळ असतात की, घरी जाईपर्यंत त्या फाटतात आणि दुसर्या दिवशी त्या कचर्यासोबत उकिरड्यावर जातात. याचा दुष्परिणाम किती मोठ्या प्रमाणावर होतो याचा विचार ना दुकानदार करतात ना ग्राहक !

सध्याच्या परिस्थितीत आपल्याकडे कचर्यामध्ये सर्वात मोठी समस्या आहे ती प्लास्टिकच्या पिशव्यांचीच. या पिशव्यांचा कचरा नष्ट होत नाही, त्यामुळे तो सर्वत्र पसरलेला दिसतो. त्यामुळे इतर अनेकसमस्या निर्माण होताना दिसत आहेत. गटारे साफ करत असताना त्यामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या बाटल्याच सापडतात. पावसाळ्यात ही सर्व गटारे तुंबली जातात. थोडासा जरी पाऊस पडला तरी त्यामुळे रस्त्यावर पाणी येणे, वाहतुकीला अडथळा निर्माण होणे, सोसायट्यामध्ये पाणी जाणे हा प्रकार सर्वत्र दिसू लागला आहे. या परिस्थितीला प्लास्टिक आणि त्याचा वारेमाप वापर व टाकाऊ वृत्तीच कारणीभूत आहे. ही समस्या शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. आज खेड्यातही प्लास्टिक कचर्यामुळे ओढे, नाले, गटारी तुंबलेली आढळतात.

आज मुंबईसारख्या ठिकाणी किंवा समुद्र किनारी असणार्या गावांमध्ये–शहरांमध्ये समुद्राच्या पाण्याचा तळ प्लास्टिकने झाकलेला आहे, इतका प्लास्टिकचा वापर वाढलेला आहे. ही एका भीषण धोक्याला जन्म घालणारी गोष्ट आहे. याचा जीवसृष्टीवर–जलसृष्टीवर अतिशय प्रतिकूल परिणाम होतो. समुद्राच्या, नद्यांमध्ये राहणारे जलचर पाण्यात टाकलेले प्लास्टिक खाऊन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. हे मृत प्राणी कापल्यानंतर त्यांच्या पोटात प्लास्टिक आढळल्याचे दिसून आले आहे. आपल्याकडे नदीत किंवा समुद्रात निर्माल्य टाकताना तेही प्लास्टिकच्या पिशवीसकट टाकले जाते. घरातील कचराही प्लास्टिकच्या कॅरीबॅगमध्ये बांधून कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा जी जनावरे खातात, त्यांच्या पोटात प्लास्टिक जाते. कोल्हापुरात अशा मोकळ्या गाई किंवा म्हशींच्या पोटातून तीस–चाळीस किलो प्लास्टिकचे कागद काढण्यात आले आहेत. म्हणजे आपल्या गैरवापरामुळे दुसर्याचा जीव जातो आहे याचा विचार माणसाने केला पाहिजे.

आज मानवी जीवनाच्या सर्व गरजांमध्ये प्लास्टिकचा वापर केला जात आहे. पेनामधील रिफिलचे उदाहरण घेतले तर पूर्वी आठ आण्याला सुटी रिफिल मिळत होती. आता ती प्लास्टिकच्या वेस्टनात मिळते. त्यामुळे तिचा आकर्षकपणा वाढला, किंमत वाढली पण पर्यावरणाचे नुकसानही वाढले. कारण रिफिल काढून घेऊन ते प्लास्टिक आवरण टाकून दिले जाते. आपण जे रेडिमेड कपडे विकत घेतो ते प्लास्टिकच्या पिशवीतच असतात. त्यामध्ये कॉलरजवळ, हातोप्यांवर प्लास्टिक लावलेले असते. अशा प्लास्टिकचे काय करायचे हा प्रश्न असतो. वस्तू आकर्षक दिसावी या विक्रीकौशल्याच्या गरजेतून हे सर्व झाले आहे, पण याची खूप मोठी किंमत पर्यावरणाच्या हानीमुळे मोजावी लागत आहे.

निसर्ग अभ्यासक म्हणून मी आणखी एका गोष्टीचे निरीक्षण केले आहे. आजूबाजूला वावरणारे पक्षीही आज घरटे बांधताना प्लास्टिक वापरत असल्याचे दिसले आहे. या घरट्यांमध्येही मला प्लास्टिकचे कागद दिसले. म्हणजे नैसर्गिक पक्षी, प्राणीसुद्धा या वापराला तयार झाले की काय, असा प्रश्न निर्माण होतो, पण यामागचे खरे कारण असे आहे की, या पक्ष्यांना ज्या गोष्टी घरटे बांधण्यासाठी आवश्यक आहे, तेच जर उपलब्ध होत नसेल आणि जिथे तिथे प्लास्टिकच दिसत असेल तर त्या पक्ष्यांचाही नाईलाज आहे. बुलबुल, चिमण्या यांच्या घरट्यात प्लास्टिक दिसू लागणे, इथपर्यंत प्लास्टिकचे आक्रमण वाढले असेल तर ते नक्कीच भनायक आहे. प्लास्टिकचा एवढा अट्टाहास कशासाठी याचे उत्तर आपल्याकडे बोकाळत चाललेल्या 'यूज ॲण्ड थ–ो' कल्चरमध्ये आहे. जागतिकीकरणानंतर आलेल्या नवअर्थकारणामध्ये आणि बाजारधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये 'वापरा आणि टाका' ही संस्कृती वेगाने पसरत गेली.

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्याभिषेकाची ऐतिहासिकता

६ जून १६७४ म्हणजे स्वराज्य निर्मितीच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी सजलेला दिवस. कारण त्या दिवशी रायगडावर शिवरायांचा स्वराज्याभिषेक पार पडला होता. त्यामुळे हा दिवस रायगडावरच नव्हे, तर महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये आणि संपूर्ण भारतभर मोठ्या थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी प्रत्येक जण शिवरायांप्रती नतमस्तक होताना दिसतो. कारण त्या दिवशी डोळ्यासमोर येतात ते त्यांचे कष्ट, त्याग, समर्पण आणि संघर्ष. त्यांना लाभलेल्या ५० वर्षाच्या आल्पायुष्यात त्यांनी मोठा पराक्रम गाजवला. स्वतःचे शीर तळहातावर घेऊन, घरावर तुळशीपत्र ठेवून, स्वतःच्या पत्नीचे सौभाग्य पणास लावून, जीवाभावाचे कित्येक बालसवंगडी गमावून, जीवाची परवा न करता, मृत्यूला न घाबरता, रक्ताच पाणी करून, समोर अफाट शक्तीच्या, प्रचंड ताकतिच्या श्याह्यांचे साम्राज्य उभे ठाकलेले असताना स्वराज्य निर्माण करणे म्हणजे, हे जगातील आश्चर्यच! त्यांनी निर्माण केलेलं स्वराज्य हे देव, धर्म, पंथ,संप्रदाय, जात, पोटजात, गट–तट या पलिकडील होतं. ते शोषकांविरुद्ध, शोषितांचं, दुर्बलांचं, अबलांचं, शेतकरी तथा सामान्य जनता किंवा रयतेचं होतं. म्हणूनच तर ते प्रत्येकाला आपलं वाटत होतं. स्मृतीशेष, कॉम्रेड गोविंद पानसरे आपल्या शिवाजी कोण होता? या पुस्तकात म्हणतात की, शिवाजीच्या राज्यात माणसं मरायला का तयार झाली? हे ज्याला समजलं त्यालाच शिवचरित्र समजते.




काही स्वयंघोषित इतिहासकारांनी बखरी, कथा, कादंबर्या, चित्रपट, नाटकं, गोष्टी लिहून शिवचरित्र अफजलखान, दिलेरखान ,शाहिस्तेखान ,सिद्धी जोहर, आग्र्याहून सुटका तथा पन्हाळ्यावरून पलायन एवढ्यापुरतंच मर्यादित केलं.परंतु ते तेवढ्यापुरतं मर्यादित नसून स्वराज्यामध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या महान मानवी मूल्यांची जोपासना आता अंमलबजावणी होत होती. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधान लिहून पूर्ण केल्यानंतर पत्रकारांनी प्रश्न विचारला, की आपणास राज्यघटना लिहितांना काही अडचणी तर आल्या नाही? तेव्हा ते म्हणाले की, शिवाजी महाराजांचे स्वराज्य माझ्या डोळ्यासमोर असल्यामुळे, मला कोणतीही अडचण येणे शक्य नव्हते. एवढच नव्हे तर, महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी 'हर हर महादेव' व 'शिवाजी महाराज की जय' ह्या त्यांच्या घोषणा होत्या.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याभिषेकाची ऐतिहासिकता जाणून घेताना, आमच्या हे लक्षात येते, की आम्हाला प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत शिवाजी महाराजांचा इतिहास राज्यभिषेकासह शिकवला जातो. परंतु त्यामध्ये राज्याभिषेकाला कोणी व का विरोध केला? त्यांचे पुरोहित्य करण्यासाठी अख्खा महाराष्ट्र सोडून वाराणसीहून गागाभट्टांना का बोलवावे लागले? त्यांनी दुसरा राज्याभिषेक का केला? राज्याभिषेकाचा खर्च किती झाला? राज्याभिषेक विरोधाचा विपरीत परिणाम राजमाता जिजाऊंच्या प्रकृतीवर कसा झाला? अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे इतिहासाने दडवून ठेवली होती आणि आमच्याही सद्विवेकाने व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस केले नाही. परंतु शिवाजी महाराजांच्या काही कट्टर तथा सच्च्या अनुयायांनी त्यांच्या समकालीन साहित्याच्या मुळाशी जाऊन सत्यशोधनाचं महत्त्वपूर्ण कार्य केलं, त्यामुळे इतिहासाला एक वेगळी कलाटणी मिळाली.

शिवाजी महाराजांनी १६६८ पासूनच रायगडची राजधानी म्हणून निवड केलेली होती. त्या गडाचे बांधकाम स्वतः त्यांनी करून घेतले होते. त्यासभोवती नैसर्गिक तटबंदी असल्यामुळे, तो अतिशय भक्कम व सुरक्षित होता. आपला राज्याभिषेक सोहळा होऊन आपण अनभिषिक्त राजे व्हावे अशी मनीषा व्यक्त करताच , शूद्रांचा राज्याभिषेक होऊ शकत नाही ,असे म्हणत दरबारातील अधिकारी तथा नोकरांसह महाराष्ट्रातील तमाम भट पुरोहितांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकून, राज्याभिषेकास नकार दर्शविला. त्यानंतर दरबारातील केशवभट, सोमनाथभट आणि भालचंद्रभट या तिघांना महाराष्ट्राचे रहिवासी असणाऱ्या गागाभट्टला राज्याभिषेकाचे पुरोहित्य करण्यासाठी निमंत्रित करण्यासाठी वाराणसीला पाठवण्यात आले .परंतु त्यांनीही त्याच सबबीखाली नकार दिला. त्यानंतर मात्र कायस्थ असणाऱ्या बाळाजी आवजी यांनी निळो यसाजी यांना शिवाजी महाराजांचे घराणे हे राजस्थानमधील उदयपूरचे मूळ रहिवासी असून त्यांचा संबंध शिसोदिया राजपूत घराण्यासोबत असल्याचे काही बनावट कागदपत्र घेऊन पाठवण्यात आले. सोबत त्यांना राज्याभिषेकाची अतिरिक्त दक्षिणाही मिळेल असे आश्वासित केले. त्यानंतर मात्र गागाभट्टाने पुरोहित्याची तयारी दर्शवली. सर्व धर्मग्रंथांचा गाशा गुंडाळून, अभिलाषेपोटी रायगडाच्या पायथ्याशी येऊन ते पाचाडात थांबले. तेथेही त्यांना महाराष्ट्रीयन भट पुरोहितांनी व काही ब्राह्मण्यवाद्यांनी भ्रमित करण्याचा प्रयत्न केला. त्यांना सांगण्यात आले, 'की आपण शिवाजीचा राज्याभिषेक केला, तर ब्राह्मणशाहीला, पुरोहितशाहीला न्यूनता आल्याशिवाय राहणार नाही'. त्यामुळे पुन्हा आपला शब्द फिरवत शिवाजी महाराजांच्या ऐवजी आपण बाळाजी आवजीचा राज्याभिषेक करण्यास तयार असल्याचे संगितले. यामधून असे ध्वनित होते, की एखाद्या महान व्यक्तीचं कर्तुत्व नाकारून सामान्य व्यक्तीला मोठं करावं व सर्व बागडोर आपल्याच हातात ठेवावी! परंतु धनाच्या अभिलाषेपोटी व जिवाच्या भीतीपोटी गागाभट्टांनी, 'गागाभट्टी' हा ग्रंथ लिहून त्यामध्ये कायस्थ हलके असल्याची व शिवाजी महाराजांच्या घराण्याचा संबंध हा उदयपूरच्या राजपूत घराण्याशी असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न करून राज्याभिषेक सोहळा पार पाडला.

समकालीन काही इतिहासकाराच्या नोंदी व शिवाजी महाराजांच्या दप्तर खाण्यातील जमाखर्च , यावरून राज्याभिषेकासाठी चार कोटी सव्वीस लाख लाख रुपये खर्च झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये व्रात्यास्तोम विधी, शाही स्नानाच्या वेळी उपस्थित भटपुरोहितांची दक्षिणा, महाराजांची सुवर्णतुला तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजे सात जूनला उपस्थित पन्नास हजार ब्राह्मण स्त्री–पुरुष, मुले यांना दिलेली भेट व इतर काही खर्च यांचा त्यामध्ये समावेश आहे .

अशाप्रकारे राज्याभिषेकाला अनेक अडचणी येवुन शिवाजी महाराजांना नानाविध अपमान सहन करावे लागले. ज्यांच्या प्रेरणेने हे स्वराज्य निर्माण झालं होतं, त्या राजमाता जिजाऊंना हे सहन न झाल्यामुळे त्यांची प्रकृती ढासळली. राज्याभिषेकानंतर अवघ्या दहा दिवसात त्यांचा देहांत झाला. शिवाजी महाराजांना कधी नव्हे एवढं दुःख झालं. आपलं छत्र हरवल्याचं त्यांना जाणवू लागलं. त्यांना नाईलाजास्तव सर्व अपमान सहन करून स्वराज्याभिषेक करणे अगत्याचे होते. त्याशिवाय राजा म्हणून मान्यता मिळणे शक्य नव्हते. राज्यातील ब्राह्मणांसह सर्व प्रजेला दंडित करण्याचा अधिकार मिळवायचा असेल तर, मान्यतेप्रमाणे वैदिक पद्धतीने स्वराज्याभिषेक करणे गरजेचे होते. परंतु राजमाता जिजाऊंच्या निधना नंतर त्यांना अपमानाचे शल्य आणखीच बोचू लागले. शेवटी उद्विग्न होऊन त्यांनी अवैदिक पद्धतीने दुसरा स्वराज्याभिषेक करण्याचा निर्णय घेऊन, अवघ्या अठरा दिवसांनी म्हणजे २४ सप्टेंबर १६७४ रोजी त्यांनी निश्चलपुरी गोसावी यांच्या हस्ते दुसरा अवैदिक स्वराज्याभिषेक करून ब्राह्मणी धर्माची सर्व बंधने झुगारून लावली. शिवाजी महाराजांचा दुसरा स्वराज्याभिषेक व त्यांचा राजस्थानातील राजपूत घराण्याची जोडण्यात आलेला संबंध याविषयी कॉ. शरद पाटलांनी आपल्या 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण? मोहम्मदी की ब्राह्मणी' या पुस्तकांमध्ये बरीच रहस्य उजागर केलेली आहेत.

पहिल्या स्वराज्याभिषेक प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांचा शुद्र म्हणून अपमान भट– पुरोहितांनी ज्या धर्मग्रंथांच्या आडून केला, त्या अपमानाचा बदला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याच मनुस्मृती नावाच्या धर्मग्रंथाला जाळून घेतला. त्यांनी दि . २५ डिसेंबर १९२७ रोजी आपल्या काही ब्राह्मण मित्रांच्या सहकार्याने रायगडाच्या पायथ्याशी महाड येथील चवदार तळ्याकाठी मंत्रोच्चारात मनुस्मृतीचे जाहीर दहन केले. एवढेच नव्हे तर भारतीय संविधानामध्ये अशी व्यवस्था करून ठेवली, की लोकशाही पद्धतीने जो कोणी राजा (प्रधानमंत्री) होईल, त्याचा राज्याभिषेक (शपथविधी) करण्यासाठी भट पुरोहिताची गरजच ठेवली नाही. दिनांक २२ मे २००४ रोजी भारतीय लोकशाहीला जगात सर्वात मानाचं स्थान मिळालं, कारण त्या दिवशी अल्पसंख्यांक शिख समुदायातील डॉ. मनमोहन सिंग यांना अल्पसंख्यांक मुस्लिम समुदायातील राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी प्रधानमंत्री पदाची शपथ दिली. तर ३० मे २०१९ रोजी ओबीसी समुदायातील नरेंद्र मोदी यांना अनुसूचित जाती(एस. सी.) समुदायातील राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि २०२४ ला अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी समुदायातील महिला राष्ट्रपतींनी त्यांना प्रधानमंत्री पदाची शपथ दिली.धर्मग्रंथाच्या व वर्णव्यवस्थेच्या भाषेत सांगायचे झाले तर, एका अतिशूद्र व्यक्तीने व अतिशूद्र महिलेने एका शूद्र व्यक्तीचा राज्याभिषेक केला. ही भारतीय संविधानाची करामत आहे. याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणूनच तर एक कवी म्हणतो की,

********

दोनच राजे इथे गाजले कोकण पुण्यभूमीवर  
एक त्या रायगडावर  
एक चवदार तळ्यावर

*********

भिमराव परघरमोल  
व्याख्याता तथा अभ्यासक  
फुले शाहू आंबेडकरी विचारधारा  
तेल्हारा जि. अकोला  
मो.९६०४०५६१०४

# वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीवांचे डॉक्टर मात्र निश्चितच होता येईल : सूक्ष्मजीवशास्त्र–संधींचा एक महासागर

सूक्ष्मजीवशास्त्र म्हणजे सूक्ष्मजीवांचा अभ्यास करणारे विज्ञान.यामध्ये बॅक्टेरिया (जिवाणू),व्हायरस (विषाणू),फंगस (बुरशी) आणि प्रोटोजोआ (आदीजीव) यांचा समावेश होतो.ह्या क्षेत्रात करियर करायचे असल्यास अनेक विविध पर्याय उपलब्ध आहेत. या सजीव सृष्टीमध्ये अगदी मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत पावलापावलागणीक सूक्ष्मजीवांचा सहभाग आहे.अगदी सुईच्या टोकावर लाखोंच्या संख्येने सूक्ष्मजीव मावतात मग,या सजीवसृष्टीचा व्याप आपण लक्षात घेतला तर असे म्हणायला हरकत नाही की,सूक्ष्मजीवांच्या सृष्टीमध्ये इतर आपण आणि इतर जीव राहतो.या अतिसूक्ष्म असणाऱ्या सूक्ष्मजीवांमध्ये प्रचंड सामर्थ्य आहे आणि म्हणूनच या सूक्ष्मजीवांना वापरून विविध क्षेत्रात मानवाने खूप काही साध्य केले आहे.सूक्ष्मजीवशास्त्रात भविष्य उज्वल आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले तरीही,सूक्ष्मजीवांचे डॉक्टर होऊन विज्ञानाच्या या शाखेत यश मिळवण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत.सूक्ष्मजीवशास्त्राच्या विस्तृत दुनियेतील करियरच्या विविध संधी आहेत.त्यामध्ये सर्वप्रथम शैक्षणिक आणि संशोधन संधी : सूक्ष्मजीवशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक,व्याख्याता किंवा संशोधक म्हणून करियर करता येते.अनेक विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये सूक्ष्मजीवशास्त्राचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.यातून संशोधनासाठी केंद्र सरकार मार्फत विविध फेलोशिप्स,प्रकल्प आणि लाखो रुपयांपासून ते कोटींपर्यंत अनुदाने मिळविता येतात.औद्योगिक क्षेत्रातील संधी : फार्मास्युटिकल (औषधनिर्माण),फूड अँड बिव्हरेजेस (अन्न आणि पेय),एग्रीकल्चर (कृषी) आणि बायोटेक्नॉलॉजी (जैवप्रौद्योगिकी) या उद्योगांमध्ये सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांची मोठी मागणी आहे.औषधनिर्मिती,अन्न प्रक्रिया आणि पर्यावरणीय जैव तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये कार्य करण्यासाठी अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत.वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्य : सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ विविध वैद्यकीय प्रयोगशाळांमध्ये आणि हॉस्पिटल्समध्ये कार्यरत असतात.रोग निदान,लस विकास आणि संसर्गजन्य रोगांचा अभ्यास या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहेत.सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांना रोग नियंत्रण आणि प्रतिबंधक उपाययोजना यावर काम करावे लागते.सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांनी या जगाला कोव्हिड–१९ सारख्या अतिशय विनाशकारी विध्वंसापासून वाचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. म्हणून ज्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळाला नाही,त्यांना या क्षेत्रात काम करून सूक्ष्मजीवांचे डॉक्टर मात्र निश्चितच होता येते.जैवप्रौद्योगिकी आणि आण्विक जीवशास्त्र : सूक्ष्मजीवशास्त्राच्या तंत्रज्ञानाचा वापर करून जैवप्रौद्योगिकी क्षेत्रात संशोधन आणि विकासाच्या कार्यातही संधी उपलब्ध आहेत.जैवप्रौद्योगिकी कंपन्या नवीन उत्पादने तयार करण्यासाठी आणि पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांची गरज भासते.सूक्ष्मजीवशास्त्रात करियर करायचे असेल तर आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता: सूक्ष्मजीवशास्त्रातील करियरसाठी बी.एस्सी.(सूक्ष्मजीवशास्त्र),एम. एस्सी.(सूक्ष्मजीवशास्त्र),पीएच.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र) ह्या अभ्यासक्रमांची आवश्यकता असते.ह्या व्यतिरिक्त बायोइन्फॉर्मेटिक्स, बायोटेक्नोलॉजी,मेडिकल मायक्रोबायोलॉजी,क्लिनिकल रिसर्च,मॉलिक्युलरबायोलॉजी आणि नॅनो टेक्नॉलॉजी या जीवशास्त्रातील कोर्सेस करूनही करियरच्या विविध संधी मिळू शकतात. सूक्ष्मजीवशास्त्रातील करियर संधींच्या अनेकविध शक्यता असलेल्या या क्षेत्रात विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नवीन उंची गाठण्याचे मार्ग आहेत.डॉक्टर नाही होता आले तरी सूक्ष्मजीवांचे डॉक्टर होऊन मात्र विज्ञानाच्या महत्त्वपूर्ण शाखेत यशस्वी होण्याचे स्वप्न निश्चितच पूर्ण करू शकता.



**********

– डॉ.दीप्ती ढेरे काळे  
सहाय्यक प्राध्यापक  
सूक्ष्मजीवशास्त्र विभाग  
दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर.

# अफगाणिस्तान, बलुच आणि पाक


सध्या पाकिस्तान हा एकीकडे अफगाणिस्तान तर दुसरीकडे बलुचच्या संघर्षात सापडला आहे. अफगाण आणि बलुचने पाकिस्तानविरोधात संघर्ष आणखी तीव्र केला आहे.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील संबंध बिघडत चालले असून दोन्ही देशांच्या सैन्यांतील तणाव वाढला आहे. बरमाचा सीमेवर दोन्ही सैन्यांमध्ये २९ मे रोजी गोळीबार झाला. हा परिसर पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताला समांतर आहे. सीमेवर नव्या चौक्या तयार करण्यावरून गेले काही काळ जो वाद सुरू होता तो विकोपाला गेला. पाकिस्तानी सैन्याने अफगाणी चौक्यांवर बॉम्ब डागले. त्यानंतर पाक सैन्याकडून नव्या चौक्यांचे काम थांबवण्यात आले. डुरंड लाइनवर कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानला नव्या चौक्या उभारू देणार नसल्याची स्पष्ट भूमिका अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने घेतली आहे. पाकिस्तानकडून सीमेवर रणगाडेही तैनात केले आहेत.

डुरंड लाइनवरून पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात जुना वाद आहे. पाकिस्तान डुरंड लाइनला आपली अधिकृत सीमा मानतो. मात्र अफगाणिस्तान नाही. अफगाणिस्तानात तालिबान सरकार आल्यानंतर सीमेवर तारा लावण्याचा मुद्द्यावरून दोन्ही देशांमध्ये अनेकदा संघर्ष झाला आहे. अफगाणिस्तान–पाकिस्तान सीमेवर तेहरिक–ए–तालिबान पाकिस्तान (टीटीपी)पाकिस्तानी सैन्यावर हल्ले करून त्यांचे मोठे नुकसान करत आहे. टीटीपीला नियंत्रित करण्यासाठी पाकिस्तानी सैन्य तोफखाना, हेलिकॉप्टर, गनशिप्स आणि क्षेपणास्त्रांचा वापर करत आहे. २०२५ मध्ये, पाकिस्तानमध्ये झालेल्या ३६६ दहशतवादी हल्ल्यांमध्ये एकूण १३६० लोकांचा बळी गेला आहे. यामध्ये २१० नागरिक, ४२९ सैनिक आणि ७३१ स्वतंत्र सैनिकांचा समावेश आहे. जवळपास ४० ते ५० टक्के पाकिस्तानी सैन्य दहशतवादविरोधी अभियानांमध्ये गुंतलेले आहे.

बलुचिस्तानमध्येही हल्ले तीव्र पाकिस्तानच्या आत बलुचिस्तानमध्ये बलुचिस्तान लिबरेशन आर्मीचे (बीएलए) हल्ले अधिक तीव्र झाले आहेत. बलुचिस्तान प्रांतातील खुजदार जिल्ह्यात २१ मे रोजी शाळेच्या बसवर आत्मघातकी कार बॉम्बरकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, ३८ जण जखमी झाल्याची माहिती आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू झाल्यानंतर बलुचिस्तानच्या स्वातंत्र्ययोद्ध्यांनी स्वातंत्र्याची घोषणा केली. बलुच नेते मीर यार बलुच यांनी 'रिपब्लिक ऑफ बलुचिस्तान'च्या निर्मितीची घोषणा करीत, हा नवीन देश पाकिस्तानपासून फारकत घेत असल्याचे जाहीर केले. एवढेच नव्हे, तर बलुच संघटनेने दिल्लीत स्वतंत्र उच्चायुक्तालय सुरू करण्याची मागणी केली आहे. जागतिक पटलावर भारतासह अन्य देशांनी आपल्याला साथ द्यावी, यासाठी ते प्रयत्नशील आहेत. पाकिस्तान बलुचांचा वंशविच्छेद करीत आहे, पाकिस्तान बलुच लोकांना युद्धबंदी मानते, त्यांना बलुच संस्कृतीच नष्ट करायची आहे असा गंभीर आरोप बलुच नेते मीर यार बलुच यांनी पाकिस्तानवर केला. मीर यार बलुच हे स्वतंत्र बलुचिस्तानसाठी लढणार्या 'बलुच लिबरेशन आर्मी'चे नेतृत्वही करीत आहेत. संयुक्त राष्ट्रांनी त्यांची शांतिसेना बलुचिस्तानमध्ये पाठवावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. २०२५च्या मार्च महिन्यात पाकिस्तानमध्ये बलुच बंडखोरांनी एका ट्रेनचेच अपहरण करून प्रवाशांना सुमारे ३६ तास ओलीस ठेवले होते. आज बलुचिस्तान प्रांतात ग्वादर बंदर उभारून चीनने त्या बंदराचा आणि परिसराचा ताबा घेतला आहे. यामुळे बलुच जनतेचा संताप द्विगुणित झाला आहे. चीनने काराकोरम खिंडीतून ग्वादर बंदरापर्यंतच्या रस्त्याचे काम सुरू केले आहे. ग्वादर बंदरापर्यंत रेल्वे आणि तिथेच विमानतळही अशी प्रचंड कामेही चीनने आपल्या हाती घेतली आहेत. हा चीनचा आपल्या भागातला प्रवेश जाणून बलुच जनता ही कामे पार पडू नयेत, यासाठी सतत अडथळे निर्माण करीत असते. आता या रस्त्याच्या कामावर असलेल्या चिनी कामगारांच्या संरक्षणाची जबाबदारी पाकिस्तानच्या लष्कराकडे आहे. त्यामुळे पाकिस्तानी लष्कर विरुद्ध बलुच जनता हा संघर्ष रोजचा झाला आहे. बलुचिस्तानने पाकिस्तानचा ४८ टक्के भूभाग व्यापला आहे. क्वेटा ही बलुचिस्तानची राजधानी व सर्वात मोठे शहर आहे. ग्वादर बंदर बलुचिस्तानमध्ये आहे. त्याला आणि चायना–पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोरला (सीपीइसी) बलुचींचा कडवा विरोध आहे. या प्रकल्पात चीनने फार मोठी रक्कम गुंतवली आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी चीनमधून आलेल्या कर्मचार्यांवर बलुचींचे हल्ले वाढले आहेत.

# पावसाळ्यात डेंग्यूची लागण झाल्यानंतर शरीरात दिसून येतात ‘ही’ लक्षणे, वेळीच उपचार करून घ्या शरीराची काळजी



राज्यभरात सगळीकडे पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या दिवसांमध्ये वातावरणात सतत काहींना काही बदल होत असतात. वातावरण कधी थंड असते, तर कधी वातावरणात आद्रता निर्माण होते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर वाढू लागतात. देशभरात साथीच्या आजारांची रुग्णसंख्या वाढू लागल्यामुळे आरोग्य यंत्रणेकडून आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या दिवसांमध्ये सतत सर्दी, खोकला, उलट्या, जुलाब इत्यादी आजार वाढू लागतात. हे आजार वाढल्यानंतर अजुआबाजूच्या परिसरातील लोकांनासुद्धा साथीच्या आजाराची लागण होते. शरीरात थकवा, अशक्तपणा वाढू लागल्यांस तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

सतत बाहेरचे तेलकट किंवा उघड्यावरचे पदार्थ खाल्यामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. पावसाळ्यात डेंग्यूच्या डासांची पैसाद मोठ्या प्रमाणावर होते. डेंग्यू झाल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती पूर्णपणे कमकुवत होऊन जाते. शरीरातील पांढऱ्या पेशी डेंग्यू झाल्यानंतर कमी होऊन जातात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला डेंग्यू झाल्यानंतर शरीरात कोणती लक्षणे दिसून येतात? आजारापासून बचाव करण्यासाठी आरोग्याची कशी काळजी घ्यावी, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

डेंग्यू झाल्यानंतर शरीरात दिसून येणारी लक्षणे:

थंडी ताप उलट्या होणे

जुलाब

शरीरात थकवा अशक्तपणा वाढणे

सर्दी

संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी सोपे उपाय:

आजूबाजूला पाणी साचू देऊ नका:

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये डेंग्यू, मलेरिया किंवा कावीळ इत्यादी आजारांची लागण होण्याची शक्यता असते. हे आजार झाल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होऊन जाते. त्यामुळे घराच्या आजूबाजूला डेंग्यूच्या डासांची पैदास होऊ नये म्हणून कुठेही पाणी साचून देऊ नका. कुलर, बादली, फुलपात्रे, जुने टायर इत्यादी ठिकाणी पाणी साचू देऊ नका. याशिवाय घराच्या आजूबाजूला स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे.

अंगभर कपडे घालणे:

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये मच्छर चावू नये म्हणून पूर्ण अंगभर कपडे घालावे. यामुळे त्वचेला कोणतीही हानी पोहचणार नाही. सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी लांब आणि अंगभर कपडे घालावेत. कारण संध्याकाळच्या वेळी जास्त मच्छर येतात. डास चावू नये म्हणून दरवाजा, खिडक्यांवर जाळ्या लावून ठेवाव्यात. यामुळे मच्छर घरात येणार नाही.

रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे:

निरोगी आरोग्यासाठी शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे आवश्यक आहे. या दिवसांमध्ये आहारात हेल्दी आणि शरीरास आवश्यक असलेल्या पदार्थांचे सेवन करावे. आजारात भाज्या, फळे, ड्रायफ्रूट इत्यादीचे सेवन करावे. यासोबतच शरीराला आवश्यक असलेली पुरेशी झोप घ्यावी. यामुळे तुम्ही कायम फ्रेश आणि निरोगी राहाल.

# संध्याकाळच्या नाश्त्यात लहान मुलांसाठी झटपट बनवा पदार्थ पाहून मुलं होतील खुश





लहान मुलांना नाश्त्यात नेहमीच काय द्यावं? असा प्रश्न पालकांना नेहमीच पडतो. नाश्त्यामध्ये मुलं सतत बाहेर विकत मिळणारे पिझ्झा, बर्गर किंवा इतर तेलकट पदार्थ खाण्यास मागतात. मात्र नेहमीच तेलकट तिखट पदार्थ खाणे लहान मुलांच्या आरोग्यासाठी चांगले नाही. सतत जंक फूडचे सेवन केल्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होत नाही. शरीराला योग्य पोषण न मिळाल्यामुळे वाढत्या वयात आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला लहान मुलांसाठी आचारी पनीर टिक्का पराठा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. नेहमीच नाश्त्यात मैद्याचे पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर झटपट तुम्ही पराठा बनवू शकता. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं पनीर खायला खूप आवडते. पनीर आरोग्यासाठी पौष्टिक आहे. चला तर जाणून घेऊया आचारी पनीर टिक्का पराठा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: पनीर लाल तिखट मीठ शिमला मिरची कांदा दही सातू पावडर आलं लसूण पेस्ट हिरवी मिरची जिऱ्याची पावडर गरम मसाला कोथिंबीर लोणचं मसाला बटर कृती: आचारी पनीर पराठा बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या बाऊलमध्ये शिमला मिरची, कांदा आणि पनीरचे बारीक तुकडे करून घ्या.

मिश्रण तयार करताना सगळ्यात आधी दही घेऊन त्यात लाल तिखट, हळद, चवीनुसार मीठ, जिऱ्याची पावडर, चाट मसाला, लोणचं मसाला घालून मिक्स करा.

नंतर त्यात बारीक करून घेतलेल्या भाज्या टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करून घ्या.

पॅनमध्ये बटर घालून तयार केलेले पनीर दोन्ही बाजूने भाजून घ्या. पनीर आणि भाज्या जास्त भाजू नये.

चपाती घेऊन त्यावर सॉस लावून पसरवून घ्या. त्यानंतर त्यावर भाजून घेतलेला पनीर टिक्का आणि भाज्यांचे तुकडे पसरवून घ्या.

त्यानंतर वरून बारीक चिरून घेतलेला कांदा आणि चीज पसरवून घ्या. तयार केलेला पराठा फोल्ड करून सॅण्डविच मेकरमध्ये टोस्ट करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला आचारी पनीर टिक्का पराठा.

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने महाराष्ट्राची लोकपरंपरा कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध









लातूर : – राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित झालेल्या कलावंतांचा महाराष्ट्राची लोकपरंपरा हा सांस्कृतिक कार्यक्रम भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या जन्मदिनानिमित्ताने दयानंद सभागृहात झाला या कार्यक्रमास प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. प्रत्येक लोककलेच्या सादरीकरणाला उत्स्फूर्तपणे रसिकांनी दाद देऊन प्रचंड टाळ्यांचा पाऊस पाडला. श्रीगणेश वंदनापासून शेवटच्या भैरवीपर्यंत उपस्थिताच्या अंतकरणाला हात घालणारे जिवंत सादरीकरण झाल्याने हा कार्यक्रम रसिक मनावर चिरकाळ राहणार असाच ठरला.

आ. रमेशआप्पा कराड मित्र मंडळाच्या वतीने जागतिकिकरणाच्या युगातही लोकपरंपरा जतन आणि संवर्धन करणारे प्रा. गणेश चंदनशिवे यांचा महाराष्ट्राची लोकपरंपरा हा सांस्कृतीक कार्यक्रम बुधवारी सायंकाळी दयानंद सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रारंभी भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते आ. रमेशआप्पा कराड यांचा सपत्नीक जाहीर यथोचित सत्कार करण्यात आला याप्रसंगी औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, भाजपाच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर कार्याध्यक्ष विक्रमकाका शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

शाहीर हैबती यांच्या गणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली सुरुवातीस रंगमंच आणि प्रेक्षकांना वंदन करत सरस्वती वंदना सादर करण्यात आली. संतांच्या आणि शहिरांच्या गणगौळणी बरोबरच प्रभू श्रीकृष्णाचे वेगवेगळे रूप दाखवण्यात आले. नवरात्र उत्सवात महिलांनी दररोज एक झाड लावून भविष्यातील विनाश टाळण्याचा संदेश दिला. मंगलकार्य संपन्न होताना शक्तिपीठांचा गोंधळ घालण्याची महाराष्ट्रात परंपरा आहे त्यानुसार या कार्यक्रमात विधीवत पूजा करून लातूर ग्रामीण मतदार संघात सुख, शांती आणि समृद्धी प्राप्त होवो. शेतकरी कष्टकरी यांचे कल्याण होवो, रमेशआप्पांना दीर्घायुष्य लाभो त्यांच्या हातून जनतेची विधायक कामे होवो अशा आशयाची प्रार्थना करून गोंधळ कलाप्रकाराचे सादरीकरण केले.

आलीकडच्या काळात लावणीतून अश्लीलतेचे रूप दाखविले जात असताना अध्यात्मिक लावणी शृंगारिक पद्धतीने अनेक कलाकारांनी सादर केल्या. प्रेमीला सूर्यवंशी लोदगेकर यांनी सादर केलेल्या लावणीतून शृंगार रसाबरोबर भक्तीरस पाहायला मिळाला. माझ्या कातड्याचा जोडा शिवावा वाटे मजला तुमच्या पायात घालावा ही भावनिक बैठकीची लावणी सादर करून रसिकांची मने हेलावून टाकली. रसिकांना गहिवरून टाकले तर प्रा. योगेश चिकटगावकर यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा पिंगळा सादर करून जीवनाचे सत्य उलगडून टाकले. योग्य मार्गाने गरजेपुरताच पैसा कमवा, पैशाच्या मागे लागून माणुसकी सोडू नका, योग्य ठिकाणी खर्च करा, पशुपक्षावर दया करा, येताना काही आणले नव्हते जाताना काही घेऊन जाणार नाही याची जाणीव करून दिली.

शाहीर सुरेश जाधव यांनी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील अंगावर शहारा आणणारा पोवाडा सादर केला. शिवरायांच्या सहकाऱ्यांनी जीवाचे रान केले म्हणून हिंदवी स्वराज्य स्थापन झाले अन्यथा आज देव देवळात राहिला नसता. आपले पूर्वज राहिले नसते तर आज आपण जन्माला आलो नसतो असे सांगून शिवरायांच्या विचाराची आज गरज आहे. असे सांगून शाहिरांनी रसिकांना साजरीकरणातून शिवकालात घेऊन गेले.

लोपपावत चाललेली महाराष्ट्राची लोकपरंपरा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न त्याचबरोबर प्रचार आणि प्रसार करण्याचे काम प्रा. गणेश चंदनशिवे आणि त्यांचे सहकारी करीत आहेत. लोककलेचे विविध प्रकार एकाच व्यासपीठावर रसिकांना पाहायला मिळाले. पारंपारिक संबळ, डफली, ढोलकी, पेटी, तबला आदि वाद्य आणि त्यांची जुगलबंदी अनुभवास मिळाली. अप्रतिम आणि जीव ओतून कला सादर केली तर रसिक डोक्यावर घेतल्याशिवाय राहत नाहीत हा प्रत्यय या कार्यक्रमातून आला. प्रत्येक कलाविष्कारांना रसिकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली प्रचंड टाळ्यांचा पाऊस पडला खऱ्या अर्थाने हा कार्यक्रम रसिक मनावर चिरकाल कायम राहणारा ठरला. शेवटी रामचंद्र तिरुके यांनी उपस्थित रसिकासह लोककलावंतांचे जाहीर आभार व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते लातूरातील रसिक प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला होता.

# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला. त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे.त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवांसाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दु:खात सहभागी व्हायला पाहिजे. १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला.त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते.ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे राज्याभिषेक सोहळाघराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.



शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे.शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.१९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते.कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्र्वास,तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वत: बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते. हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा. यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे.यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदूषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.शिवरायांना माझा मानाचा मुजरा. =॑ जय शिवाजी=॑. हर हर महादेव.

**********

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

( स्वतंत्र पत्रकार )

मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# कुरकुरीत टिक्की, मऊ बन, आवडीच्या भाज्या अन् सॉस; घरी बनवा मार्केट स्टाईल टेस्टी



बर्गर हा पाश्चिमात्य फास्टफूडचा प्रकार असला, तरी हल्ली तो आपल्या भारतीय चवीनुसारही तयार केला जातो. व्हेज बर्गर हा एक स्वादिष्ट आणि पौष्टिक पर्याय आहे ज्यामध्ये भाज्यांची टिक्की, भाजलेल्या पावांमध्ये ठेवून त्यावर चीज, सॉस आणि काही ताज्या भाज्या घालून तयार केला जातो. हा बर्गर घरच्या घरी सहज बनवता येतो आणि लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतो.

अनेकदा आपण बाहेरून बर्गर खरेदी करतो आणि खातो मात्र ते फ्रेश असतेच असे नाही आणि यात आपले पैसे वाया जातात. अशात आज आम्ही तुमच्यासाठी व्हेज बर्गरची एक सोपी आणि सहज अशी रेसिपी घेऊन आलो आहोत जिच्या मदतीने तुम्ही घरीच टेस्टी बर्गर तयार करू शकता. मुलांच्या टिफिनसाठी, किटी पार्टीसाठी अथवा विकेंड स्पेशल नाश्त्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. चला तर मग नोट करूयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य उकडलेले बटाटे – ३

उकडलेली मटार – ट कप

किसलेले गाजर – ञ कप

कॉर्न – ञ कप (पर्यायी)

आले-लसूण पेस्ट – १ टीस्पून

हिरवी मिरची आणि कोथिंबीर – १ टेबलस्पून

लाल तिखट – ट टीस्पून

गरम मसाला – ट टीस्पून

मीठ – चवीनुसार

ब्रेडक्रम्ब्स – ट कप

कॉर्नफ्लोअर – २ टेबलस्पून (पाणी घालून पेस्ट तयार करा)

तेल – तळण्यासाठी

बर्गर तयार करण्यासाठी:

बर्गर बन्स – ४

मेयोनीज – ४ टेबलस्पून

टोमॅटो सॉस – २ टेबलस्पून

चीज स्लाइस – ४

टोमॅटोचे स्लाइस – ४

कांद्याचे स्लाइस – ४

काकडी स्लाइस – ४

बटर– २ टेबलस्पून

कृती

व्हेज बर्गर बनवण्यास सर्वप्रथम एका बाऊलमध्ये बटाटे, मटार, गाजर, आले-लसूण पेस्ट, मिरची-कोथिंबीर, तिखट, मीठ, गरम मसाला घालून चांगले मिक्स करा. त्याचे चपटे टिक्की बनवा

टिक्कीला प्रथम कॉर्नफ्लोअरच्या पेस्टमध्ये घाला आणि नंतर ब्रेडक्रम्ब्समध्ये कोट करा

गरम तेलात हे टिक्की कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. (पर्यायी – एअर फ्राय किंवा पॅन फ्रायही करू शकता.)

बर्गर बन्स मधोमध कापून, थोडं बटर लावून तव्यावर दोन्ही बाजूंनी थोडं खरपूस भाजून घ्या

बन्सच्या आतल्या बाजूंना मेयोनीज आणि टोमॅटो सॉस लावा, तुम्ही तुमच्या आवडीचा सॉसही यात लावू शकता

खालच्या बन्सवर टिक्की ठेवा, त्यावर चीज स्लाइस, टोमॅटो, कांदा व काकडीचे स्लाइस ठेवा

वरचा बन ठेवून हलका दाबा.

# लातूर मनपाच्या वतिने मनपा शाळेतील विद्यार्थांना मोफत तायक्वांदो प्रशिक्षण शिबिर.

### मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन.

लातूर :- राजमाता जिजाऊ महानगरपालिका शाळा क्रमांक ११ येथे लातूर महानगरपालिका व तायक्वांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतीने दहा दिवसीय मोफत तायक्वांदो स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिरास सुरुवात करण्यात आली असून या शिबिराचे उद्घाटन मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे व मनपा शिक्षण विभाग प्रमुख सौ नागमे यांच्या हस्ते पार पडले तर कार्यक्रमासाठी मनपा शाळा क्रमांक ११ चे मुख्याध्यापक वैभव बोंदर आंतरराष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक मास्टर नेताजी जाधव, मास्टर के वाय पटवेकर, मास्टर धनश्री मदने, मास्टर जानवी मदने यांची उपस्थिती होती. महानगरपालिकेच्या हद्दीतील शाळेमध्ये विविध क्रियाशील व विद्यार्थ्यांच्या हिताचे उपक्रम राबवून महानगरपालिकेचे विद्यार्थी सरस बनवण्याच्या हेतूने या उपक्रमाचे आयोजन उपायुक्त डॉक्टर खानसुळे यांनी केले आहे. दहा दिवस चालणारे हे तायक्वांदो







स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना सामान्य जीवन जगत असताना येणाऱ्या अडीअडचणी सोबत दोन हात करण्याची क्षमता निर्माण केली जाणार असून दहा दिवस खेळाडूंना सकस आहाराबरोबर मार्शल आर्ट प्रशिक्षण दिले जाणार असून महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना सक्षम केले जाणार असल्याचे मत उपायुक्त डॉ खानसुळे यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केले आहे. हे प्रशिक्षण दिनांक पाच जून ते पंधरा जून दरम्यान सकाळी नऊ ते साडेदहा या वेळेत पार पडणार आहे. या शिबिरास साठ विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनपा शिक्षक देवराज लंगोटे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनपा शिक्षक श्री मांडे व सौ गुजे यांनी नियोजन केले होते. यावेळी पत्रकार बांधवही उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींनी केले 'सिंदूर'च्या रोपट्याचे वृक्षारोपन ; कच्छच्या महिलांनी दिली होती रोपट्याची भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'ऑपरेशन सिंदूर'वर सविस्तर चर्चा केली होती. त्यात आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मोदींनी 'सिंदूर'च्या रोपट्याचे वृक्षारोपन केले आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानावरील वृक्षारोपणाचे फोटो पंतप्रधान मोदींच्या अधिकृत सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींनी फोटोच्या कॅप्शनमध्ये, १९७१ च्या युद्धात धैर्य आणि शौर्याचे अद्भुत उदाहरण सादर करणाऱ्या कच्छच्या शूर माता आणि बहिणींनी माझ्या अलिकडच्या गुजरात भेटीदरम्यान मला सिंदूर भेट दिली.असे लिहिले आहे. त्यांनी पुढे लिहिले की, आज जागतिक पर्यावरण दिनी, नवी दिल्लीतील पंतप्रधानांच्या निवासस्थानी ते रोप लावण्याचे सौभाग्य मला मिळाले आहे. असे म्हटले आहे. तसेच पुढे पंतप्रधान मोदींनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये, ही वनस्पती आपल्या देशाच्या महिला शक्तीच्या शौर्याचे आणि प्रेरणेचे एक मजबूत प्रतीक राहील. 'असे म्हटले आहे. उल्लेखनीय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी १० दिवसांपूर्वी गुजरात दौऱ्यावर होते. दाहोदमधील एका सभेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, जर कोणी आपल्या बहिणींचे सिंदूर पुसण्याचा प्रयत्न केला तर त्याचे स्वतःचेही पुसणे निश्चित आहे. निवासस्थान परिसरात लावले रोप चेवळ त्यांनी म्हटले होते की,ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नाही हे आपल्या भारतीयांच्या मूल्यांचे आणि भावनांचे अभिव्यक्ती देखील आहे. पहलगाम हल्ल्याचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदींनी असेही म्हटले होते की दहशतवाद्यांनी काहीही केले तरी मोदी गप्प राहू शकतात का? दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांनी स्वप्नातही कल्पना केली नसेल की मोदींशी स्पर्धा करणे इतके कठीण होईल.

## भारताची सर्वात तरुण महिला आयर्नमॅन रेनी नोरोन्हा

भारताची सर्वात तरुण महिला आयर्नमॅन रेनी नोरोन्हा (वय १९) हिने १४ तासांत आयर्नमॅन हॅम्बर्ग युरोपियन चॅम्पियनशिप पूर्ण केली. आयआयटी मद्रासची विद्यार्थिनी असलेल्या रेनी हिने तरुणांमध्ये सहनशक्तीच्या खेळांच्या उदयाचे विजेतेपद पटकावले आहे. हॅम्बर्ग, जर्मनी १ जून २०२५ : भारताची सर्वात तरुण महिला आयर्नमॅन रेनी नोरोन्हा हिने १ जून २०२५ रोजी आयर्नमॅन हॅम्बर्ग युरोपियन चॅम्पियनशिप यशस्वीरित्या पूर्ण केली. दृढनिश्चय आणि क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेचे एक प्रभावी प्रदर्शन याद्वारे केवळ १४ तासांत रेनी नोरोन्हा हिने कठीण शर्यत पूर्ण केली. युरोपमधील सहनशक्तीच्या स्पर्धांपैकी सर्वात महत्वाची एक असलेल्या या चॅम्पियनशिपमध्ये ३.८ किमी पोहणे, १८० किमी सायकल चालवणे आणि ४२.२ किमी मॅरेथॉनचा समावेश आहे. अवघ्या १९ वर्षांच्या रेनीने ही स्पर्धा जिंकून हे सिद्ध केले आहे की, वय हे उच्च दर्जाच्या ॲथलेटिक यशासाठी अडथळा नाही. जिंकण्याची इच्छाशक्ती व प्रयत्नातील सातत्य यामुळे विजय निश्चित असतो. रेनीला मिळालेल्या यशानंतर ती म्हणाली, स्पर्धे



तील माझा सहभाग हा केवळ शर्यत पूर्ण करण्यासाठी नव्हता, भारतातील तरुणांना, प्रामुख्याने मुलींना हे दाखवून देण्यासाठी होता की, सहनशक्तीचे खेळ आपल्यासाठी देखील आहेत. या खेळात तुम्ही निर्माण केलेली शिस्त आणि आत्मविश्वास तुमचे व्यक्तिमत्व बदलण्यास सहाय्यक ठरते. विद्यार्थीदशेतील खेळाडू ते आयर्नमॅन फिनिशर असा रेनीचा प्रवास तरुणवर्गाला एक आदर्शमय असा प्रवास आहे. तिच्या कामगिरीमुळे विद्यार्थीवर्गातील खेळाडूंमध्ये एक सांस्कृतिक बदल घडवून येण्याची आशा आहे. इच्छुक ट्रायथलीट्स खेळाडूंना समर्थन देण्यासाठी अधिक दृश्यमानता, प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधा याकरीतास रेनीचे यश प्रभावशील ठरते. रेनी नोरोन्हा हिच्या यशाचा संदेश स्पष्ट आहे: सहनशक्तीचे खेळ केवळ उच्चभ्रूंसाठी नाहीत तर स्वत:च्या इच्छाशक्तीद्वारे प्रगती करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येकासाठी आहेत. रेनी नोरोन्हा धैर्य, संतुलन आणि धाडसी महत्वाकांक्षा या नवीन प्रवाहाचा चेहरा बनत आहे. मीडिया चौकशी, मुलाखती तसेच सहकार्याच्या संधींसाठी, कृपया संपर्क साधा:

## अस्वस्थ वातावरणात नव्या मार्गाने कृतीशील परिवर्तनाची लढाई लढावी लागेल : सेवानिवृत्त अप्पर पोलीस महासंचालक उद्धव कांबळे यांचे प्रतिपादन

लातूर:- सध्या सगळीकडे अस्वस्थ वातावरण आहे.. घुसमट आहे..उदारमतवादाने संभ्रम निर्माण केला आहे.अशा आवाहनात्मक परिस्थितीत नवे मार्ग, नवी दिशा स्वीकारून कृतिशील समाज परिवर्तनाची लढाई आपल्याला लढावी लागेल. असे आवाहन सेवा निवृत्त अप्पर पोलीस महासंचालक उद्धव कांबळे यांनी लातूर येथे केले. लातूर येथे जी -२४ च्या वतीने ५जून रोजी अंजनी हॉटेलच्या सभागृहात आयोजित व्याख्यान प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. त्यांनी भारताची विद्यमान राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थिती या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी न्यायाधीश ऍड. आर. वाय. शेख हे होते. तर प्रा. सुभाष भिंगे, प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे, नरसिंग घोडके, यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्धव कांबळे पुढे म्हणाले, सद्या पराभूत मनस्थिती समाजात दिसून येत आहे. आपल्याला अपयश मान्य करावेच लागेल. त्याची कारणे शोधली पाहिजे. लोकांना जुन्याच भ्रमात रेंगाळत ठेवण्याचे काम पद्धत शिरपणे केले जातं आहे. लोकांना पटवून दिले पाहिजे. वर्तुळ भेदून बाहेर गेलं पाहिजे. आरएसएस वाले जसे माणसे गळाला लावतात. तसे केले पाहिजे. लोकांना जेव्हा गुलामीच्या बेड्या अलंकार वाटू लागतात तेव्हा समाज परिवर्तनाचे काम अवघड असते. पण ती जबाबदारी आपल्याला झटकता येणार नाही. लोकात गेलं





पाहिजे. असे त्यांनी सांगितले. तसेच निवडणुकां जिंकण्याचे राजकारण करावे लागेल. त्यासाठी लोकांभिमुख व्हावे लागेल. आजपर्यंत जवळपासच सगळ्यांची पक्षांनी भाजपला मदत केलेली आहे. असे सांगून त्यांनी अर्थव्यवस्था, राजकारण व सांस्कृतिक परिस्थितीबद्धल उहापोह केला. तर अध्यक्षीय भाषणात ऍड. आर. वाय. शेख यांनी म्हटले, भारत देश हा कोण्या विशिष्ट जाती धर्माचा देश नाही. आज देशात संविधानाचे पालन होतांना दिसत नाही. मुस्लिम या देशात स्वतःला असुरक्षित समजतात. हे दूषित वातावरण भारतीय लोकशाहीसाठी घातक आहे. धर्मनिरपेक्षता, संविधान, लोकशाही टिकवण्यासाठी विचारवंत बुद्धिजीवी लोकांनी पुढे यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांचा वाढदिवस असल्याने मान्यवरांच्या हस्ते त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बरकत काझी यांनी केले, सूत्रसंचालन रामराजे आत्राम यांनी केले तर आभार नारशिंग घोडके यांनी मानले. उपस्थितामध्ये माधव बावगे, प्रा. शिवाजी शिंदे, प्रा. अशोक नारनवरे, शरद झरे आदिसह मोठ्या संख्येने लोकं उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात समाजकार्य माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात संपन्न

### स्व.प्रा.एन.जी.स्वामी यांच्या स्मरणार्थ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहाची निर्मिती करण्याचा सर्व माजी विद्यार्थ्यांचा निर्धार

लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा नुकताच महाविद्यालयाच्या व्होकेशनल सभागृहामध्ये उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विचार मंचावर सं १९८३-८५ या बॅचचे पहिले विद्यार्थी ॲड. माधव जाधव, प्रा. आशिष स्वामी, डॉ. दत्ता करंडे आणि प्रा. नागेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी ॲड. माधव जाधव म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात १९८३ साली समाजकार्य विभागाला सुरुवात झाली आणि मी लागलीच त्या विभागांमध्ये प्रवेश घेतला त्यानंतर या महाविद्यालयातील स्व.एन.जी.स्वामी, डॉ. ईश्वर शेटकार, प्रा.जी.आर. मुचाटे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांचे मौलिक सहकार्य मिळाल्यामुळे मी आज वर्ग दोनचा अधिकारी म्हणून निवृत्त झालो आहे. या महाविद्यालयांतर्गत चालणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहाचा मी विद्यार्थी असल्यामुळे या महाविद्यालयामध्ये स्व.एन.जी. स्वामी यांच्या स्मरणार्थ वस्तीगृहाच्या निर्मितीसाठी मी माझे योगदान देण्यास तयार आहे असे सांगून त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले यावेळी माया बनसोडे, अमोल अपसिंगेकर, अनिल गायकवाड, नितीन कांबळे, महेश कोळळे, प्रीतम कांबळे, अविनाश कांबळे आदींनी आपापल्या मनोगतातून त्यांना त्यांच्या तीन वर्षाच्या काळामध्ये महाविद्यालय शिक्षण घेत असताना आलेल्या अनुभवांची मांडणी करून स्व. एन. जी. स्वामी यांच्या स्मरणार्थ वस्तीगृहाच्या निर्मितीसाठी आपण सर्वांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे असेही त्यांनी सर्वांना सांगितले यावेळी डॉ. दत्ता करंडे, प्रा. नागेश जाधव आणि प्रा. आशिष स्वामी यांनीही विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले अध्यक्षीय समारोप करताना डॉ. संजय गवई म्हणाले की, आपण सर्व समाजकार्य विभागातील विद्यार्थी एकत्र येऊन स्व निधी




संकलित करून आजचा हा स्नेह मेळावा सर्वांच्या सक्रिय सहभागातून संपन्न करीत आहात त्याबद्दल आपले सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि समाजकार्य विभागाच्या शैक्षणिक विकासासाठी आपण गेस्ट लेक्चर, स्किल लॅब, संशोधन आणि क्षेत्रकार्य कार्यशाळा यासोबत स्व. प्रा. एन. जी. स्वामी यांनी महाविद्यालयाच्या वस्तीगृहासाठी दिलेले योगदान आपल्या स्मरणार्थ राहावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन वस्तीगृहाची निर्मिती केली पाहिजे यासाठी महाविद्यालय आणि संस्था सुद्धा आपल्याला सहकार्य करायला तयार आहे असे सांगून सर्व विद्यार्थ्यांचे समाजकार्य विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यातर्फे हार्दिक अभिनंदन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोनाली काथवटे हिने केले तर सूत्रसंचालन महामुनी कांबळे आणि आशा कांबळे यांनी केले या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील १९८३ पासूनचे आजपर्यंतचे सर्व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. आशिष स्वामी, डॉ. दत्ता करंडे आणि प्रा. नागेश जाधव यांनी गुलाब पुष्प देऊन यथोचित स्वागत केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, संगमेश्वर मुळे, आरती जोशी, नितीन कांबळे आणि प्रीती आगाशे यांनी परिश्रम घेतले.

## आता बसही हवेत उडणार ! नितीन गडकरी देहरादूनमध्ये 'एअर बस' आणणार? ; वाचा सरकारचा जबरदस्त प्लॅन

उत्तराखंडची राजधानी देहरादूनमधील गंभीर वाहतूक समस्येच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक अनोखा प्रस्ताव मांडला आहे. त्यांनी अशी डबल-डेकर एअर बस प्रणाली लागू करण्याबद्दल सांगितले जी रस्त्यावर धावणार नाही, तर जमिनीच्या वरच्या हवेत धावेल. असे म्हटले आहे. नितीन गडकरी यांचा हा सल्ला उड्डाणपूल आणि सिग्नल सिस्टीमसारख्या पारंपारिक वाहतूक उपायांपेक्षा वेगळा आहे आणि शहरी पायाभूत सुविधांसाठी नवीन विचार आणि नाविन्यपूर्णतेचे प्रतीक बनू शकतो. गडकरी यांचे दूरदृष्टी नितीन गडकरी म्हणाले की, शहरी वाहतुकीच्या गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी पारंपारिक उपाय आता पुरेसे नाहीत. त्यांनी रस्ते आणि हेलिकॉप्टरने डेहराडूनमधील वाहतूक परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर शहराला नवीन विचारसरणीच्या पायाभूत सुविधांची नितांत आवश्यकता असल्याचे मानले. त्यांनी उत्तराखंड सरकारला या हवाई बस प्रणालीसाठी सविस्तर प्रस्ताव पाठवण्यास सांगितले आहे आणि केंद्र सरकारला प्रस्ताव प्राप्त होताच, ते या प्रकल्पासाठी पूर्ण सहकार्य करेल असे आश्वासनही दिले आहे. एअर बस सिस्टीम म्हणजे काय? आणि ते कसे काम करेल? या प्रकल्पाची तांत्रिक माहिती अद्याप सार्वजनिक केलेली नाही, परंतु एअर बस म्हणजे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जी पारंपारिक बसेसप्रमाणे रस्त्यावर न धावता हवाई ट्रॅक किंवा केबल्सवर धावेल. या प्रणालीमध्ये डबल-डेकर बसेस असू शकतात ज्या जमिनीच्या वाहतुकीच्या वर धावतील, त्यामुळे रस्त्यांवरील भार कमी होईल. ही वाहतूक व्यवस्था कदाचित वीज किंवा हरित ऊर्जा यांसारख्या पर्यावरणपूरक स्रोतांद्वारे चालवली जाईल, ज्यामुळे प्रदूषण देखील कमी होईल आणि पर्यावरणपूरक देखील असेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले की, आता वेळ आली आहे जेव्हा भारताने पर्यायी आणि स्वच्छ वाहतूक पर्यायांकडे वाटचाल करावी. देहरादूनला अशा उपायाची गरज का आहे

# राज्यातील ९०३ रखडलेल्या योजनांना क्लोज फाईल, नव्या प्रकल्पांना मिळणार गती!

मुंबई : राज्य सरकारने विकास प्रक्रियेत ठोस पावले उचलताना तब्बल ९०३ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, मृद व जलसंधारण विभागामार्फत रद्द करण्यात आलेल्या योजनांमध्ये लघुपाटबंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव, बंधाऱ्यांची दुरुस्ती यांसारख्या योजना समाविष्ट आहेत. या योजनांची अंमलबजावणी गेल्या तीन वर्षांपासून ठप्प होती. काही ठिकाणी भूसंपादनातील अडचणी, स्थानिकांचा विरोध तर काही ठिकाणी ठेकेदारांचे असहकार्य हे मोठे कारण ठरले. परिणामी, निधी अडकून पडला होता आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचू शकत नव्हती. राज्य सरकारच्या मते, या निर्णयामुळे निधीचा अपव्यय टाळला जाईल आणि नव्या योजनांसाठी मार्ग मोकळा होईल. जिल्हा व तालुका स्तरावर या निर्णयाचे पडसाद उमटणार असून स्थानिक पातळीवर नव्या प्रकल्पांना गती मिळू शकते.लाडकी बहीण योजनेसाठी निधी वळवला? वादाला उधाण दरम्यान, ९०३ योजना रद्द करण्यात आल्यामागे राज्यातील बहुचर्चित 'लाडकी बहीण योजना'मुळे निर्माण झालेला आर्थिक ताण हेही कारण असू शकते, अशी चर्चा सुरु आहे. मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे आरोप फेटाळून लावत, अर्थसंकल्प कसा काम करतो हे न कळणाऱ्यांचे आरोप आहेत, असं स्पष्ट केलं. दर महिन्याला हजारो कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी राखीव ठेवला जातो. नुकतेच मे महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE